N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** उस्मानाबाद **P.S.(ठाणे):** आनंदनगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0112 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/03/2024 18:17

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 28/03/2024

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 28/03/2024

**Time From (वेळेपासून):** 12:15 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:32 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 28/03/2024 **Time (वेळ):** 17:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 048

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/03/2024 17:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जिल्हाअधिकारी कार्यालय गेट नं , धाराशिव येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

10 To

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अंबादास रामलिंग शिंदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा चोराखळी, ताकळंब,जिधाराशिव,आनंदनगर,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा चोराखळी, ताकळंब,जिधाराशिव,आनंदनगर,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9921075511

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | देवानंद मरगु कांबळे | | | 1. राहुल माकुडे यांचे घरी किरायान,ग्रीनलड शाळेसमोर,, आनंदनगर,उस्मानाबाद,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 4000/रूपये ज्यात 500रुपये दराच्या 8चलनी नोटा असे एकुण | 4,000.00 |



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

4,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

-: फिर्याद :- दिनांक 28.03.2024

मी अंबादास रामलिंग शिंदे, वय 42 वर्षे, व्यवसाय- शेती व ट्रॅक्टर चालक, रा.चोराखळी, ता.कळंब, जि.धाराशिव, मो.नंबर 9921075511, 9822812355

मी आज दिनांक 27.03.2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, धाराशिव येथे पोलीस निरीक्षक, श्री राठोड, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव यांचे समक्ष हजर राहुन माझी तक्रार दिली होती. त्यातील थोडक्यात हकीकत अशी की, मला माझे मावस भावाचे प्लॉटवर 50 ब्रास मुरुमची आवश्यकता असल्याने मागील आठवड्यामध्ये मी तहसिल कार्यालय, धाराशिव येथे अर्ज देण्यासाठी गेलो होतो. सदर ठिकाणी मौजे येरमाळा सर्कलचे मंडळ अधिकारी कांबळे साहेब यांची भेट झाली होती. तेव्हा त्यांनी मला काय काम काढले असे विचारले असता त्यांना मी मला मौजे चोराखळी येथील गट क्रमांक 639/1 मधील 50 ब्रास मुरुम लागणार असुन त्यासाठीचा अर्ज करण्यासाठी आलो असल्याचे सांगितले. तेव्हा त्यांनी मला तुम्ही किती दिवस शासकीय फिस भरत राहणार, यापुर्वी बऱ्याचवेळा भरली आहे की, आता आम्ही असल्यावर काय फीस भरत बसणार आहात असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना मग काय करु असे विचारले असता त्यांनी जावा तुम्ही फीस (रॉयल्टी) वगैरे भरत बसू नका, मी आहे, चार-पाच हजार रुपये दया, अनं तुम्हाला किती मुरुम घेवुन जायचयं तेवढा घेवुन जावा मी तुमच्या तलाठयाला पण सांगतो असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना ठिक आहे, बघु पुढच्या आठवडयात खेपा टाकताना असे बोलुन निघुन आलो होतो. वगैरे सविस्तर तक्रार दिली होती.

वरील प्रमाणे तक्रार दिल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राठोड यांनी माझी व दोन शासकीय पंच श्री विनायक गुणवंतराव पाटील, वरिष्ठ लिपिक व शिवकुमार नागनाथ आयनापुरे, लिपिक यांची तसेच त्यांचे सोबत असलेले स्टाफमधील कर्मचारी पोहेकॉ/ जाधव, पोना/बेळे, पोशि/डोके यांचेशी आपसी परिचय करुन दिला. तसेच पोनि राठोड यांनी पंच क्रमांक 1 म्हणुन विनायक गुणवंतराव पाटील व पंच क्रमांक 2 म्हणुन शिवकुमार नागनाथ आयनापुर यांची निवड केली. त्यानंतर राठोड साहेब यांनी मला माझी तोंडी तक्रार सांगण्यास सांगितली असता मी माझी तोंडी तक्रार दोन्ही पंचासमक्ष सांगितली व ती संगणकावर टंकलिखित केली. संगणकावर टंकलिखित केलेली माझी तक्रार मी पुन्हा वाचुन बरोबर असल्याची खात्री करुन त्यावर मी व राठोड साहेब यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर सदरची तक्रार दोन्ही पंचांना वाचण्यास दिली. सदरची तक्रार दोन्ही पंचांनी वाचुन पाहिली. मी सांगितलेली तोंडी व संगणकावर टंकलिखित केलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्यानंतर दोन्ही पंचांनी त्यावर सहया केल्या. त्यानंतर मी दिलेली तक्रार पोनि राठोड साहेब यांनी स्वत:कडे ठेवुन घेतली.

त्यानंतर पोनि राठोड साहेब यांनी मला दोन्ही पंचासमक्ष सांगितले की, माझ्याकडे माझे तक्रारीमधील नमुद कामासाठी कांबळे साहेब हे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत दिनांक 27.03.2024 रोजी पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर राठोड साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोहेकॉ जाधव यांनी त्यांचेकडील एका काळ्या रंगाच्या बॅग मधुन Sony कंपनीचे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर üü बाहेर काढुन त्यामध्ये 32 GB चे नवीन S◌anDisk कंपनीचे Micro SDHC I असे वर्णन नमूद असलेले मेमरी कार्ड टाकले व राठोड साहेब यांनी कळविले की, लाचमागणी पडताळणी दरम्यान तक्रारदार व कांबळे साहेब यांचेत होणारे मुळ संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये रेकॉर्ड होणार आहे. पोहेकॉ जाधव यांनी सदर व्हाईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनी मुद्रीत झाले नसले बाबत मला व दोन्ही पंचाना खात्री करून देण्यात आली.

त्यानंतर मला कांबळे साहेब हे कोठे भेटतील याबाबत विचारणा केली असता मी त्यांना कांबळे साहेब यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे भेटण्यासाठी बोलविल्याचे सांगितले. त्यावरुन पोनि राठोड साहेब यांनी मला सुचना केली की, मी पंच क्रमांक 1 पाटील यांना सोबत घेवुन जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे जावुन त्यांची भेट घ्यावी. त्यांना स्वत:चे कामाबाबत बोलावे. दरम्यान त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांचेकडुन वेळ मागुन घेवुन



Scanned with CamScanner

सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत यावे असे सांगितले. तसेच पंच क्रमांक 1 पाटील यांना देखील सुचना दिल्या.
त्यानंतर राठोड साहेब यांचे सुचनेवरुन पोहेकॉ जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे आतमध्ये बनियनला पिनने लावुन ठेवुन दिले. त्यानंतर मला व पंच क्रमांक 1 यांना माझेकडील होंडा कंपनीची युनिकॉर्न मोटार सायकल क्रमांक एम.एच.25 ए.क्यु. 4041 ने रवाना केले. तेवढयात कांबळे यांचा मला फोन आला व कुठं थांबलाव असे विचारले तेव्हा मी त्यांना आलो एक मित्र भेटला होता, आलोच कलेक्टर ऑफिसला असे म्हणालो... त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे गेलोत. तेथे गेटवरच कांबळे साहेब उभा असलेले दिसले. तेव्हा त्यांचेजवळ जावुन त्यांची भेट घेतली. तेव्हा त्यांना मावस भावाला मुरुम टाकायचा हाय.. पन्नास एक ट्रॅक्टर.. तेच्याकडं नाहीत पैसे.. नियोजन चालु आहे .. पवार साहेबाला म्हणलं करुन टाकु.. असे म्हणालो.. तेव्हा त्यांनी काहीतरी थोड नॉमीनल बघायच होतं .. असे म्हणुन मुरुम कुणाला कुठे टाकायचा याबाबत आमचे चर्चा झाली. त्यानंतर त्यांनी संध्याकाळीच कराव लागतयं.. दिवसा जरा लावा लावी होतीय.. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना आपल क्लिअर सांगा असे म्हणालो असता त्यांनी पवारनच येवुन मला हजार दोन हजार दिलेले आहेत.. त्याला म्हणलं मनान दे.. निवंत संध्याकाळी करुन घ्या.. काय नाही तलाठयाला बी सांगतो तिथल्या.. असे म्हणाले. संध्याकाळी करा निवांत असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना किती सांगु त्याला असे म्हणालो असता त्यांनी पैश्याबाबत ईशारा करुन तुमच्या हिशोबाने तुम्ही करा असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना तुम्हीच सांगा असे म्हणालो. तेव्हा ते फक्त तुम्ही सांगितले बस झालं मला.. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना चार हजार सांगु का असे म्हणालो. तेव्हा त्यांनी तुमच्या हिशोबान काही हि करा.. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना येतो घेवुन मग काय हाय ती असे म्हणालो. तेव्हा त्यांनी हं चालतयं असे म्हणाले. अश्या आशयाचे आमचे बोलणे झाल्यानंतर मी व पंच क्र. 1 पाटील असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलोत.
त्यानंतर पोहेकॉ जाधव यांनी माझ्याजवळील व्हॉईस रेकॉर्डर काढुन राठोड साहेब यांचे ताब्यात दिले. त्यांनी ते घेवुन बंद केले व मला बाजुच्या रुममध्ये थांबण्यास सांगितले. लगेच थोडया वेळात मला जवळ बोलावुन हकीगत विचारली असता मी वरील प्रमाणे हकीगत पंच क्रमांक 02 यांचे समक्ष सांगितली. कांबळे साहेब यांनी मौजे चोराखळी येथील देवस्थान जमीन गट क्रमांक 639/1 मधील 50 ब्रास मुरुम शासकीय फीस (रॉयल्टी) न भरता घेवुन जाण्यासाठी तसेच संबंधित तलाठी यांना कारवाई न करणे बाबत सांगण्यासाठी माझेकडे 4000/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम लागलीच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले आहे.
त्यानंतर पोनि राठोड साहेब यांनी सांगितले की, सापळापुर्व कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यांचे सुचनेवरुन मी माझ्याजवळील सर्व रोख रक्कम व चिजवस्तु त्यांचे कार्यालयातील टेबलवर काढुन ठेवल्या. त्यानंतर मी काढुन ठेवलेल्या चिजवस्तु व्यतिरिक्त इतर काही माझेकडे नसल्याची खात्री करुन मी हजर केलेले 4000/- रुपये ज्यामध्ये 500/- रुपये दराच्या 8 चलनी नोटांना ॲन्थ्रासीन पावडर लावणे, ॲन्थ्रासीन पावडरचे उपयोग, अॅल्ट्राव्हायलेट दिव्याचा उपयोग व गुणधर्म , त्याचे प्रात्यक्षिक दाखवुन तसेच लाचेच्या नोटांची अंधारात अॅल्ट्राव्हायोलेटच्या दिव्याखाली तपासणी वगैरे कार्यवाही केल्यानंतर पोशि डोके यांनी लाचेच्या नोटा माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवुन दिल्या व उर्वरीत वस्तु परत केल्या असता त्या मी माझे पॅन्टचे समोरील डावे बाजुचे खिशामध्ये, टोपी डोक्यावर व मोबाईल शर्टचे छातीवरील डावे बाजुचे खिशामध्ये ठेवुन दिला. त्यानंतर लाच स्विकृतीनंतर डोक्यावरील टोपी डावे हाताने काढुन खाली धरणे बाबत मला ईशारा नेमुण दिला.
त्यानंतर पोलीस निरीक्षक राठोड यांनी मला, दोन्ही पंचाना व सापळा पथकातील सदस्यांना सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोनि राठोड साहेब यांच्या संागण्यावरुन पोहेकॉ जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन 32 GB चे नवीन SanDisk कंपनीचे Micro SDHC I असे वर्णन नमुद असलेले मेमरीकार्ड टाकले. सदर व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन पिनने माझे शर्टचे आत बनियनला पिनने लावुन पंच क्रमांक 1 यांचेसह मला माझेकडील मोटार सायकलने रवाना केले. आमचे पाठोपाठ सापळा पथक देखील रवाना झाले. मी व पंच क्रमांक 1 असे माझेकडील मोटार सायकलने जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे गेलोत. सदर ठिकाणी कांबळे साहेब यांची भेट न झाल्याने मी त्यांना माझे मोबाईलवरुन फोन लावुन बोललो असता त्यांनी जे.सी.बी.वाल्या पवारकडे दया..असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना पवार तयार व्हायचं नाही असे म्हणालो असता त्यांनी रामभाऊ मिसाळकडे दया असे म्हणाले..तेव्हा मी त्यांना बोलतो पवार साहेब असे म्हणुन फोन कट केला. त्यानंतर लगेच पवार यांना फोन लावुन कांबळे साहेबांनी तुमच्याकडं पैसे दया म्हणलेत असे म्हणुन कांबळे साहेबाला फोन करा असे म्हणुन फोन ठेवला. त्यानंतर मी व तक्रारदार असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलोत. तेव्हा जाधव साहेब यांनी राठोड साहेब यांचे सांगण्यावरुन व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद करुन राठोड साहेब यांचे ताब्यात दिले. तेव्हा मी राठोड साहेब यांना पवार हे माझे नातेवाईक व व्यवसाय पार्टनर असल्याने त्यांचेकडे पैसे देणार नाही. उदईक रोजी कांबळे साहेब यांचेकडेच पैसे देतो असे म्हणालो होतो. तेव्हा राठोड साहेब यांनी माझे ताब्यातील लाच रक्कम पंचाकरवी त्यांचे ताब्यात घेतली.



Scanned with CamScanner

त्यानंतर सदर दिवशीची कारवाई स्थगित केली होती.
आज दिनांक 28.03.2024 रोजी सकाळी कांबळे साहेब यांना फोन करुन रात्री मुरुम टाकुन घेतले बाबत बोललो होतो. तेव्हा त्यांनी ठिक आहे पैसे घेवुन जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे येणेबाबत सांगितल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, धाराशिव येथे 12.15 वा. येवुन राठोड साहेब यांना सदर बाबत सांगितले. त्यावरुन राठोड साहेब यांनी आज दिनांक 28.03.2024 रोजी कांबळे साहेब यांचेविरुध्द जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगुन मला, पंचांना व सापळा पथकातील कर्मचारी यांना सुचना दिल्या. त्यानंतर पोशि डोके यांनी सिलबंद लिफाफा फाडुन त्यामधुन अ‍ॅथ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम काढुन माझे पॅन्टचे समोरील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर लाच स्विकृतीनंतर सापळा पथकास दिसेल अशा पध्दतीने डोक्यावरील टोपी डाव्या हाताने काढुन खाली धरणे बाबत ईशारा नेमुण दिला.
त्यानंतर पोहेकॉ जाधव यांनी राठोड साहेब यांचे सुचनेवरुन व्हॉईस रेकॉर्डर माझे शर्टचे आतमध्ये बनियनला पिनने लावुन मला पंच क्र. 1 पाटील यांचेसह रवाना केले. आमचे पाठोपाठ सापळा पथक देखील रवाना झाले. तेव्हा मी व पंच असे जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे गेटवर गेलो असता समोरच कांबळे साहेब उभा होते. तेव्हा त्यांचेजवळ जावुन त्यांची भेट घेवुन त्यांचेशी कामाचे अनुषंगाने बोलणे झाले. दरम्यान त्यांनी पैश्याबाबत ईशारा केल्याने मी माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशातील नोटांची घडी उजवे हाताने काढुन चार हजार रुपये आहेत असे म्हणुन समोर धरले असता त्यांनी उजवे हाताने घेवुन त्यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवुन दिले. तेव्हा मी मला नेमुण दिलेला ईशारा केला. ती वेळ साधारणत: 13.32 वा.ची होती. मी ईशारा केल्यानंतर लागलीच पोनि राठोड तसेच पंच क्रमांक 2 व सापळा पथक सदर ठिकाणी हजर आले. त्यानंतर पोनि राठोड यांचे सुचनेवरुन पोहेकॉ जाधव यांनी माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन घेवुन बंद करुन राठोड साहेब यांचेकडे दिले. त्यानंतर मला लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, धाराशिव येथे येणेबा धाराशिव येथे येणेबाबत सांगितले. त्यावरुन मी सदर ठिकाणी हजर आलो. थोडयावेळानंतर राठोड साहेब व त्यांचा स्टाफ लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, धाराशिव येथे आले.
तेव्हा राठोड साहेब यांनी सर्वांसमक्ष कांबळे साहेब यांना त्यांचे नावाबाबत विचारले असता त्यांनी त्याचे नाव देवानंद मरगु कांबळे, वय 51 वर्ष, मंडळ अधिकारी, येरमाळा सर्कल, ता.कळंब, जि.धाराशिव, रा. राहुल माकुडे यांचे घरी किरायाने, ग्रीनलॅड शाळेसमोर, आनंदनगर, धाराशिव असे असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि राठोड यांनी मला बाजुला थांबण्यास सांगितले. त्यावरुन मी बाजुला जावुन थांबलो.
त्यानंतर काही वेळाने पोनि राठोड यांनी पुन्हा मला त्यांचे रुममध्ये बोलावुन रुमच्या खिडक्या, दरवाजा व लाईट बंद करुन केलेल्या कृत्रीम अंधारात माझ्या हातांची व कपडयांची तपासणी केली तेंव्हा माझे उजवे हाताचे बोटाचे पे-यावर तसेच माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशाचे तोंडास व आतील बाजुस ठिकठिकाणी अंथ्रासीन पावडरची चकाकी दिसुन आली. त्यानंतर पोनि राठोड यांचे सुचनेवरुन मी माझेकडील सर्व चिजवस्तु काढुन दाखविल्या. तसेच राठोड साहेब यांनी दोन्ही पंचा समक्ष हकीगत विचारली तेंव्हा मी वरील प्रमाणे हकीगत सांगितली. त्यानंतर पोनि राठोड यांनी माझे व दोन्ही पंचासमक्ष रेकॉर्डर मधील संभाषण ए‌ैकले.
एकंदरीत मी दिनांक 27.03.2024 रोजी दिलेल्या तक्रारीवरुन मौजे चोराखळी येथील देवस्थान जमीन गट क्रमांक 639/1 मधील 50 ब्रास मुरुम शासकीय फीस (रॅायल्टी) न भरता घेवुन जाण्यासाठी तसेच संबंधित तलाठी यांना कारवाई न करणे बाबत सांगण्यासाठी माझेकडे 4000/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम आज दिनांक 28.03.2024 रोजी पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना पोलीस निरीक्षक, विकास राठोड यांनी लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले आहे. म्हणुन माझी देवानंद मरगु कांबळे, वय 51 वर्ष, मंडळ अधिकारी, येरमाळा सर्कल, ता.कळंब, जि.धाराशिव, रा. राहुल माकुडे यांचे घरी किरायाने, ग्रीनलॅड शाळेसमोर, आनंदनगर, धाराशिव यांचेविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी मी माझी फिर्याद देत आहे. हिच माझी फिर्याद असुन सदरची फिर्याद मी वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे.



Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
SATYAWAN LAXMAN AGARKAR
**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):**
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देण्रा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** [illegible]
**Rank(पद):** I (In[illegible])
**No.(सं.):**

पोलीस अंमलदार
पोलीस ठाणे
आनंदनगर,धाराशिव



Scanned with CamScanner